शुक्रवार, २७ ऑक्टोबर २०२३

जनमानसातील घडामोडी सांगणारे सायं दैनिक...

# सह्याद्री

sahyadrimedia23@gmail.com

DIGITAL BULLETIN

घडामोडी : क्रिडा - आरोग्य - राज्यकीय - कला - सांस्कृतिक

# बाल मेळाव्याच्या माध्यमातून मुलांचा सर्वांगिण विकास : नगरगाव सरपंच सौ. संध्या खाडिलकर

## श्री हनुमान विद्यालयात बालमेला उत्साहात प्रारंभ

**वाळपई, सह्याद्री (प्रतिनिधी):** **मुलांचा शिक्षणाचा पाया मजबुत बनविण्यासाठी अभ्यासाबरोबर इतर कला आत्मसात करण्यासाठी सुट्टीचा दिवसात बाल मेळाव्या सारखे उपक्रम राबवुन मुलांचा सर्वांगिण विकास करण्याकडे** विद्यालयाचा हा सुप्त उपक्रम कौतुकास्पद असुन अश्या कार्यक्रमातुन मुलांचा खऱ्या अर्थाने विकासाला चालना मिळत असते असे प्रतिपादन नगरगाव सरपंच सौ. संध्या खाडीलकर यांनी वेळुस वाळपई येथे श्री हनुमान विद्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या बालमेलाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

यावेळी व्यासपिठावर वाळपई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नरहरी हळदणकर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुविधा बर्वे, बालभवनच्या नृत्य शिक्षिका प्रेमा च्यारी, संगीत शिक्षक सुनिल म्हाऊसकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना नरहरी हळदणकर म्हणाले, विद्यालयातर्फे मुलांना शिक्षणाबरोबर इतर विविध प्रकारचे शिक्षण दिले जात आहे. गेल्या अनेक वर्षापासुन शाळेचा निकाल चांगला लागत आहे. मुलांच्या प्रगतीत शिक्षकांबरोबर पालकांचा वाटा महत्वाचा असतो. आम्ही सर्वांना घेऊन पुढे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे.

सुविधा बर्वे यांनी विद्यालयाच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. प्रेमा च्यारी यांनी आपले विचार मांडले.

सदर बालमेला हा चार दिवस चालणार असुन इयत्ती तिसरी व चौथीच्या विद्यार्थांसाठी आयोजित करण्यात आला आहे. ह्या बालमेल्यामध्ये एकुण ७० विद्यार्थीनी सहभाग घेतला असुन मुलांना संगित, नृत्य, हस्तकला, खेळ व इ विषय शिकवले जात आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.





वाळपई : श्री हनुमान विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बाल मेलाचे दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करताना नगरगाव सरपंच सौ. संध्या खाडीलकर, सोबत नरहीर हळदणकर, सुविधा बर्वे, प्रेमा च्यारी.






















# सावर्डे सत्तरीत शारदोत्सव उत्साहात साजरा

**वाळपई ,सह्याद्री (प्रतिनिधी):** सरकारी हायस्कूल सावर्डे सत्तरी येथे शाळा व्यवस्थापन समिती व सरकारी प्राथमिक विद्यालय सावर्डे यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षीचा श्री शारदोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विठ्ठल हरिजन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने नियोजन करून पाच दिवस संपन्न झालेल्या या कार्यक्रमात सावर्डे सत्तरी ग्रामपातळीवर विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या सगळ्या स्पर्धेत वेगवेगळ्या वयोगटातील स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हातभार लावला.

यावेळी तिसऱ्या दिवशी वार्षिक श्री सत्यनारायण महापूजा विद्यार्थी कु बुलि गावकर याच्या यजमानपदाखाली संपन्न झाली व गावजेवणाचा आस्वाद आलेल्या भाविकांनी घेतला.

यावेळी वेगवेगळ्या वयोगटातील स्पर्धकांनी सहभाग घेऊन बक्षिसे मिळविली.

रांगोळी स्पर्धा १५ वर्षांखालील - प्रथम क्रमांक साईशा सावंत, व्दितीय क्रमांक सिमरन बओट्टरकर तर तृतीय क्रमांक मयूरी गावकर हिने मिळवला.

१५ वर्षे वरील गटात दर्शन नाईक प्रथम , दिव्या नाईक व्दितीय तर प्रीती कुलकर्णी तृतीय विजेती ठरली.

तीन गटात झालेल्या चित्रकला स्पर्धेत १ली ते ४थी गटात प्रथम शांताराम गावस, व्दितीय कृष्णा नाईक व तृतीय साईशा हरिजन

५वी ते ७वी गटात प्रथम श्रृती गावकर, व्दितीय साईशा सावंत व तृतीय शंकर हरिजन

८वी ते १०वी गटात प्रथम हर्ष गावकर, व्दितीय रचना हरिजन व तृतीय वैभवी हरिजन

हीट विकेट खेळात मुलांमध्ये आयुष सावंत व मुलींमध्ये रचना गावकर विजेते ठरले.

स्लो सायकल स्पर्धेत मुलांमध्ये विघ्नेश नाईक तर मुलींमध्ये रचना गावकर हिनेच विजय मिळवला.

लंगडी खेळात मुलांमध्ये रुद्र गावकर याच्या गटाने तर मुलींमध्ये मयूरी गावकर हिच्या गटाने विजय मिळवला.

वेशभूषा स्पर्धा १० वर्षांखालील गटात प्रथम चंद्रकांत सावंत, व्दितीय साक्षी गावकर व तृतीय क्रमांक रवी गावकर तर १० वर्षांवरील गटात प्रथम मयूरी गावकर व व्दितीय योगिता गावकर संगीत खुर्ची लहान मुलांमध्ये विघ्नेश नाईक तर विवाहितांमध्ये  श्रीकांत गावकर विजेते ठरले.

हत्तीला शेपूट लावण्यात कृत्तिका गावकर व व्दितीय सिता गावकर.

पाचव्या दिवशी करमळी बुद्रुक, सत्तरी येथील दिंडी मिरवणुकीने श्री मूर्तीचे म्हादई नदीत विसर्जन करण्यात आले.


















# गावात चांगले कार्य करणाऱ्यांच्या मागे

## उभे रहा : अँड शिवाजी देसाई, शादोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

**वाळपई ,सह्याद्री (प्रतिनिधी):** माणसाच्या जीवनाची सुरुवात ही त्याच्या गावा पासून होत असते. म्हणून माणूस कितीही मोठा झाला तरी त्याने आपल्या गावाच्या मातीला आणि माणसांना विसरता कामा नये. राजकारण हे फक्त चार दिवसांचे असते. राजकारणामुळे गाव आणि गावाची माणसे दुभांगता कामे नये. कारण माणसाचा जेव्हा अंतिम शेवट येतो तेव्हा माणसा सोबत सर्वप्रथम त्याच्या गावाची माणसेच असतात.आणि म्हणून आपल्या गावात ज्या ज्या चांगल्या गोष्टी होतात, जे जे लोक, व्यक्ती चांगले कार्य करतात त्यांच्या मागे गावाच्या लोकांनी शाबासकीची थाप देऊन आपल्या गावाची एकता अबाधित ठेवायला हवी असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते आणि सामाजिक कार्यकर्ते ऍड शिवाजी देसाई यांनी करंजोळ सत्तरी येथे शार्दोत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर व्यासपीठावर पंच सौ. सुचिता सत्यवान गावडे, सौ. लक्ष्मी नारायण गावडे पालक शिक्षक संघ अध्यक्ष राम महादेव गावडे, काशिनाथ अंकुश गावडे ,कृष्णा आपा गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

अँड शिवाजी देसाई म्हणाले की करंजोड या गावाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. हा ऐतिहासिक वारसा युवकांनी पुढे नेला पाहिजे. आपल्या गावात चांगले संस्कारक्षम युवक निर्माण होण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. विशेष म्हणजे आईच्या उदरात मूल वाढत असतानाच चांगले संस्कार मुलावर होणे आवश्यक असते. तसेच आपल्या मुलांमधील प्रतिभा आई वडिलांना ओळखता आली पाहिजे आणि त्यासाठी आई-वडिलांनी आपल्या मुलांना वेळ दिला पाहिजे त्यांचे निरीक्षण केले पाहिजे. आपल्या मुलांनी केलेल्या चांगल्या गोष्टीसाठी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप नेहमी आई--वडिलांनी दिली पाहिजे. आजच्या जमान्यात कौटुंबिक व्यवस्था खूप बदलत चालली आहे. भ्रमणध्वनीच्या दुरुपयोग यामुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. हे थांबले पाहिजे. यावेळी शारदोत्सव निमित्त गावातील नागरिक तसेच मुलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचे बक्षीस वितरण शिवाजी देसाई आणि मान्यवरांच्या हस्ते झाले.




करंजोळ सत्तरी येथे शारदोत्सव कार्यक्रमात श्रीमती द्रौपदी आपा गावडे आणि श्री वासुदेव कृष्णा गावडे यांचा सत्कार करताना अँड शिवाजी देसाई बाजूला काशिनाथ गावडे, सौ सुचिता गावडे, सौ लक्ष्मी गावडे, राम गावडे व कृष्णा गावडे.




गावातील लोककलाकारांचा विशेष सत्कार यावेळी करंजोळे गावातील लोक कलाकार श्रीमती द्रौपदी आपा गावडे आणि श्री. वासुदेव कृष्णा गावडे यांचा अँड शिवाजी देसाई यांच्या हस्ते शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. श्रीमती द्रोपदी आप्पा गावडे या अनेक वर्षापासून गावात विविध प्रकारची लोकगीते सकाराती सादर करतात. तर श्री वासुदेव कृष्णा गावडे हे लोकगीता बरोबरच रणमाने देखील गावात सादर करतात आणि त्यांचे रणमाले संपूर्ण गोव्यात प्रसिद्ध आहे. कार्यक्रमाचे सूत्र निवेदन श्री महादेव गावकर आणि कीर्ती गावडे यांनी केले. तर आभार सागर गावडे यांनी मानले. कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद लाभला.

# केरी-सत्तरीत २८ रोजी 'मौसम मस्ताना बायलो नास्ताना'

**पर्ये, सह्याद्री (प्रतिनिधी)**:पार्सेक-रवाडा केरी-सत्तरी येथील श्री सातेरी भगवती मंदिरात शनिवार दि. २८ रोजी कोजागिरी उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यानिमित्त सकाळपासून पूजा, अर्चा व इतर धार्मिक विधी,रात्री ९ वा. देवीच्या मंडपात श्री नटेश्वर कला संघ सुर्ला वेळगे निर्मित आणि हर्ष सातोडकर प्रस्तुत दोन अंकी धमाल कोंकणी नाटक 'मौसम मस्ताना बायलो नास्ताना' सादर करण्यात येणार आहे. भाविकांनी तीर्थप्रसाद व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन पार्सेकर समाजातर्फे करण्यात आले आहे.

# सांखळीत २८ रोजी दांडिया रास स्पर्धा

**पर्ये, सह्याद्री (प्रतिनिधी)**: सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सांखळीतर्फे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त शनिवार दि. २८ ऑक्टोबर रोजी संध्या. ६. ३० वा. काडा मार्केट सांखळी येथे दांडिया रास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच यावेळी महिला, पुरुष व मुलांसाठी वेगवेगळ्या गेम्स ठेवण्यात आल्या असून वेगवेगळी बक्षिसे देण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी ९८८१२३५०२० किंवा ९०४९४९१०२० यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन गणेशोत्सव मंडळ सांखळीतर्फे करण्यात आले आहे.

# सांखळीत २८ रोजी उमाळो कार्यक्रम

**पर्ये, सह्याद्री (प्रतिनिधी):** सांखळी येथील कोंकणी सेवा केंद्रातर्फे शनिवार दि. २८ रोजी संध्या. ५ . ३० वाजता केंद्राच्या गोकुळवाडी येथील कार्यालयात 'उमाळो' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचा हा चौथा 'उमाळो' कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात सत्तरी तालुक्यातील समाजसेवक व शिक्षक 'श्रद्धेमागील तर्कशास्त्र' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमाला डिचोली तालुक्यातील उद्योजक रमाकांत शेट्ये प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी असे आवाहन केंद्राचे सचिव प्रा.रघुदास तारी यांनी केले आहे.



संजय तेंडुलकर

# साखळी रवींद्र भवनात पारंपारिक आकाश कंदिल कार्यशाळा

**पर्ये, सह्याद्री (प्रतिनिधी):** रवींद्र भवन सांखळीतर्फे दिपावलीनिमित्त सोमवार दि. ३०ऑक्टोबर ते गुरूवार दि. २ नोव्हेंबरपर्यंत चार दिवशीय पारंपरिक आकाश कंदिल कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. कार्यशाळा रोज दुपारी २.३० ते संध्याकाळी ५.३० वाजे पर्यंत रवींद्र भवन सांखळी मुक्तांगण येथे चालणार आहे.
नाव नोंदणी करीता शेवटची तारीख शुक्रवार दि. २७ ऑक्टोबर असून ती रवींद्र भवन सांखळी कार्यालयात करावी असे रवीद्र भवन सांखळी कडून कळविण्यात आले आहे.

# भावार्थ मांद्रेकर यांच्या 'खंबीर सरनोबत हंबीरराव' पुस्तकाचे प्रकाशन

**पर्ये, सह्याद्री (प्रतिनिधी):** हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेत छत्रपती शिवाजी, संभाजी महाराज यांच्याप्रमाणे अनेकांचे खंबीर नेतृत्व लाभले. सरनोबत हंबीरराव म्हणजे स्वराज्याचा धगधगता ज्वालामुखी.स्वराज्य रक्षकांचा जाज्वल्य इतिहास म्हणजे मर्द मराठा पुस्तक श्रृंखला. त्यांतील सोनेरी पान म्हणजे 'खंबीर सरनोबत हंबीरराव' स्वराज्याच्या या हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम भावार्थ मांद्रेकर यांनी केले आहे. त्यांच्या रूपाने एक इतिहास संशोधक मिळाला आहे असे प्रतिपादन शिव फुले विचारवंत प्रा रुपेश पाटील यांनी पेडणे येथे केले.
भावार्थ मांद्रेकर यांच्या मर्द मराठा श्रृंखलेतील 'खंबीर सरनोबत हंबीरराव' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.
व्यासपीठावर सन्माननीय अतिथी म्हणून 'लोकायतन प्रकाशन'चे राकेश साळुंखे, उद्योजक नारायण सोपटे केरकर, पेडणेच्या श्री भगवती हायस्कूलचे चेअरमन प्रवीण उत्तम कोटकर, सुरभीचे अध्यक्ष चंद्रकांत सांगळे, पत्रकार प्रभाकर ढगे व लेखक भावार्थ मांद्रेकर हे मान्यवर उपस्थित होते.
भावार्थ मांद्रेकर यांनी छत्रपतींचे सरनौबत हंबीरराव मोहिते यांच्या जीवनावर लिहिलेले 'खंबीर सरनोबत हंबीरराव' हे पुस्तक म्हणजे इतिहासातील सोनेरी पान आहे.ते वाचकांना निश्चितच भुरळ पाडेल,नवा इतिहास घडवेल,असा विश्वास प्रा. रूपेश पाटील यांनी व्यक्त केला.
लोकायातन प्रकाशन,मैत्रेय प्रकाशन,सुरभी पेडणे,स्वामी विवेकानंद संस्था मोपा आणि शिवराज्य प्रतिष्ठान-केरी यांच्या संयुक्त विद्यमाने पेडणेच्या श्री भगवती हायस्कूलमध्ये हा सोहळा पार पडला. पुस्तकाचे प्रकाशक राकेश साळुंखे म्हणाले,भावार्थ मांद्रेकर यांनी चिकाटीतून अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केलेली कलाकृती म्हणजे हे पुस्तक होय. 'लोकायातनला हे पुस्तक प्रकाशित करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले.



पेडणे येथे भावार्थ मांद्रेकर यांच्या इतिहासिक पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रा रुपेश पाटील, राकेश साळुंखे, प्रभाकर ढगे, नारायण सोपटे केरकर, चंद्रकांत सांगळे व भावार्थ मांद्रेकर.

लेखक भावार्थ मांद्रेकर म्हणाले, कोरोना काळाचा परिपाक म्हणजे प्रस्तुत पुस्तक. मराठा राज्याचे किती तरी कोहिनूर हिरे इतिहासाच्या खाणीतच आहेत. अशा हिऱ्यांना शब्दरूपी पैलू पाडून समाजासमोर आणण्याचे काम लेखक या नात्याने आपण करतो आहोत.मर्द मराठ्यांचा जाज्वल्य इतिहास घराघरात आणि मनामनात पोचवण्याचे कार्य ही मर्द मराठा पुस्तक शृंखला करेल असा आशावाद मांद्रेकर यांनी यावेळी व्यक्त केला.
नवसो परब यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.उमेश गाड यांनी परिचय करून दिला.चेतन कुबल यांनी आभार मानले.

# रोटरी क्लब ऑफ फोंडातर्फे जी.व्ही.एम. च्या

## शिक्षकांचा नेशन बिल्डर पुरस्काराने गौरव

**फोंडा, सह्याद्री (प्रतिनिधी):**
रोटरी इंटरनॅशनलच्या नेतृत्वाखाली रोटरी क्लब ऑफ फोंडा, तर्फे
गोवा विद्याप्रसारक मंडळाच्या विविध शाळांमधील शिक्षकांचा नेशन बिल्डर पुरस्काराने गौरव करण्यात आला. गौरविण्यात आलेल्या शिक्षिकामध्ये आल्मेदा हायस्कूल फोंडाच्या सांताना कोलाको ई पिन्हेरो, आर.पी.आर.एस. हायस्कूल बांदोडाच्या सुषमा गावणेकर, एम.आय.बी.के. हायस्कूल खांडेपार च्या शबनम आगा व प्रगती विद्यालय बोरीच्या शिरीन खान यांचा सामावेश आहे.
गौरव प्राप्त शिक्षिकांना नेशन बिल्डर पुरस्कार रोटरीचे अध्यक्ष आरटीएन नासिर अली वाहिद यांच्यासह रोटरी सचिव आरटीन रंजित सडेकर, ,गोवा विद्याप्रसारक मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आरटीन कृष्णा शेटये ,रोटरी क्लबचे आरटीएन अशोक नागवेकर, , प्रविण कोंकर यांच्या उपस्थितीत देण्यात आला.
शिक्षकांनी केवळ अध्यापनात उत्कृष्टतेचे उदाहरण दिले नाही तर त्यांच्या शाळांमध्ये शिकण्याची आणि संस्कृती वाढविण्यातही महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामुळे त्यांना त्यांचे सहकारी, विद्यार्थी आणि संपूर्ण सहकाऱ्याकडून
प्रशंसा आणि आदर मिळाला आहे.
रोटरी इंटरनॅशनल द्वारे दिला जाणारा नेशन बिल्डर अवॉर्ड, राष्ट्र उभारणी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या आदर्शांना मूर्त रूप देत असल्याने त्याला खूप महत्त्व आहे. हे अशा व्यक्तींची निवड करतात ज्यांनी समाजासाठी सकारात्मक योगदान दिले आहे.




नेशन बिल्डर पुरस्कार गौरवप्राप्त शिक्षिका सांताना कोलाको ई पिन्हेरो यांना प्रदान करताना रोटरीचे अध्यक्ष आरटीएन नासिर अली वाहिद यांच्यासह रोटरी सचिव आरटीन रंजित सडेकर, ,गोवा विद्याप्रसारक मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आरटीन कृष्णा शेटये ,रोटरी क्लबचे आरटीएन अशोक नागवेकर, प्रविण कोंकर आदी.
















# कोजागरी पौर्णिमा (शरद पौर्णिमा)




कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वाधिक जवळ असतो. या दिवशी रात्री लक्ष्मी आणि इंद्र यांची पूजा केली जाते. मध्यरात्री लक्ष्मी पृथ्वीतलावर येऊन जो जागा आहे, त्याला धनधान्य आणि समृद्धी प्रदान करते, अशी कथा आहे. या दिवसाचे महत्त्व आणि पूजाविधी सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून समजून घेऊया.

तिथी : कोजागरी पौर्णिमा हा उत्सव आश्विन पौर्णिमा या तिथीला साजरा करतात.

इतिहास : या दिवशी भगवान श्रीकृष्णाने व्रजमंडळात रासोत्सव साजरा केला, असे श्रीमद्भागवतात म्हटले आहे.

महत्त्व : अ. वर्षातील या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ असतो आणि त्यामुळे तो मोठा दिसतो. मूळ चंद्रतत्त्वाचे म्हणजे 'चंद्रमा'चे प्रतिनिधित्व करणारा आणि आपल्याला दिसणारा चंद्र 'चंद्रमा'प्रमाणेच शीतल आणि आल्हाददायक आहे. साधकांना चंद्रासारखी शीतलता ईश्वराच्या अवतारांपासून अनुभवता येते, म्हणूनच रामचंद्र, कृष्णचंद्र अशीही नावे राम-कृष्णांना दिली गेली. चंद्राच्या या गुणांमुळेच 'नक्षत्राणामहं शशी' म्हणजे 'नक्षत्रांमध्ये मी चंद्र आहे', असे भगवान श्रीकृष्णाने श्रीमद्भगवद्गीतेत (10:21) सांगितले आहे.

आ. मध्यरात्री श्री लक्ष्मी चंद्रमंडलातून भूतलावर येऊन 'को जागर्ति' म्हणजे 'कोण जागे आहे ?', असे विचारून जो जागा असेल, त्याला धनधान्याने संतुष्ट करते.

इ. या दिवशी ब्रह्मांडात आदिशक्ती रूपी धारणेतील श्री लक्ष्मी रुपी इच्छाशक्तीची स्पंदने कार्यरत असतात. या दिवशी धनसंचयाविषयी असलेल्या सकाम विचारधारणा पूर्णत्वाला जातात.
या धारणेच्या स्पर्शाने स्थूलदेह, तसेच मनोदेह यांची शुद्धी होण्यास साहाय्य होऊन मनाला प्रसन्नधारणा प्राप्त होते. या दिवशी कार्याला विशेष असे धनसंचयात्मक कार्यकारी बल प्राप्त होते.

ई. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ, म्हणजे कोजागरी पर्वतालगत आलेला असतो. त्यामुळे या पौर्णिमेला 'कोजागरी पौर्णिमा' म्हटले जाते.

उत्सव साजरा करण्याची पद्धत : 'या दिवशी नवान्न (नवीन पिकवलेल्या धान्याने) जेवण करतात. श्री लक्ष्मी आणि ऐरावतावर बसलेला इंद्र यांची रात्री पूजा करतात. पूजा झाल्यावर पोहे आणि नारळाचे पाणी देव आणि पितर यांना समर्पून नंतर नैवेद्य म्हणून ग्रहण करतात आणि मग आपल्याकडे आलेल्या सर्वांना देतात. शरद ऋतूतल्या पौर्णिमेच्या स्वच्छ चांदण्यात दूध आटवून चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात आणि नंतर नैवेद्य म्हणून ते दूध ग्रहण करतात. चंद्राच्या प्रकाशात एकप्रकारची आयुर्वेदिक शक्ती आहे. त्यामुळे हे दूध आरोग्यदायी आहे. या रात्री जागरण करतात. करमणुकीसाठी निरनिराळे बैठे खेळ खेळतात. दुसऱ्या दिवशी सकाळी पूजेचे पारणे करतात.

कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी लक्ष्मी आणि इंद्र यांचे पूजन करण्याची कारणे : अ. या दोन देवतांना पृथ्वीवर तत्त्वरूपाने अवतरण्यासाठी चंद्र आग्रहात्मक आवाहन करतो.

आ. लक्ष्मी ही आल्हाददायक आणि इंद्र ही शीतलतादायक देवता आहे. यादिवशी वातावरणात या दोन देवता तत्त्वरूपाने येत असल्याने आणि त्यांचे तत्त्व अधिक प्रमाणात कार्यरत असल्याने त्यांची पूजा केली जाते


लक्ष्मी आणि इंद्र यांचा पूजाविधी : अ. लक्ष्मी आणि इंद्र यांच्या पूजेत पोहे आणि नारळाचे पाणी वापरतात. पोहे हे आनंद देणारे, तर नारळाचे पाणी हे शीतलता प्रदान करणारे आहे. त्यामुळे हे दोन घटक वापरून जीव स्वतःकडे आनंद आणि शीतलता यांच्या लहरी आकर्षित करत असतो.

आ. चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात; कारण या दिवशी दुधात चंद्राचे प्रतिबिंब पाहिल्याने त्यातून प्रक्षेपित होणारे चंद्रतत्त्व आपल्याला मिळते. या दुधात स्थूल आणि सूक्ष्म रूपांतून चंद्राचे रूप अन् तत्त्व आकर्षित झालेले असते.
इ. जागरण : मध्यरात्री लक्ष्मी चंद्रमंडलातून भूतलावर येते आणि जो जागा असेल, त्याच्यावर संतुष्ट होऊन त्याला कृपाशीर्वाद देऊन जाते. त्यामुळे कोजागरीच्या रात्री जागरण केले जाते.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलक : *श्री. तुळशीदास गांजेकर ( संपर्क क्रमांक : ९३७०९५८१३२)**

# प्रेमळ माझी सासूबाई"



आठवण येता तुमची
जाग्या होती पूर्वस्मृती
दिली आईची माया
ठेवला आशीर्वादाचा हात
सोडून आले माहेर, साथ आई
बाबांची

होत्या तुम्ही सुगरण
अनुभव सांगती सर्वजण

परिजनांच्या स्वागतासाठी
असे सदैव तत्पर
आले वाटसरू
चिटपाखरू जरी
खाऊ पिऊ घातले त्यांना पोटभर

सूटली जेव्हा साथ पतीची
झेलीली वादळे आयुष्याची
खूप काबाड कष्ट करूनी

दिलेत मुलांना बळ पंखाचे
झेप घ्यावयास आकाशाची

राहीन तुमची मी सदैव ऋणी
दिला तुम्ही मला प्रेमळ धनी
राहील्या आता फक्त आठवणी
दाटीत अश्रु नयनी
आपल्या आत्म्यास शांती लाभो
हीच प्रार्थना ईश्वर चरणी

- सौ. अरुणा राजेंद्र प्रभुदेसाई
शिरोडा गोवा